


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २८७ •शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

# राज्यात कमळाचा झंझावात, ठाकरे - पवारांच्या सत्तेला सुरुंग



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ठरले धुरंधर

## • शिंदेंनी शिंदेसेनेची शान राखली; • पवार काका-पुतण्यांचा धुव्वा; • ठाकरे बंधूंच्या हातून मुंबई गेली

- मराठवाड्यात छ. संभाजीनगर, जालना, नांदेडमध्ये कमळ फुलले
- लातूर कॉँग्रेसकडे तर परभणीत उध्दव सेनेचा भगवा फडकला
- २५ महापालिकेवर भाजपने दणदणीचा विजय

मुंबई । प्रतिनिधी

मराठवाड्यातील पाच पैकी तीन महापालिकांमध्ये कमळ ुलले आहे तर एका महापालिकेवर उबाठाचा भगवा फडकला असून एका महापालिकेत कॉँग्रसने दणदणीत विजय मिळवत भाजपचा वारू रोखण्याचे काम केले आहे. राज्यभरात महापालिका निवडणुकीच्या अटीतटीच्या आणि अत्यंत चुरशीच्या लढतीत भाजपने जोरदार मुसंडी मारली असल्याचे दिसत आहे. मराठवाड्यात नांदेड, छत्रपती संभाजीनगर आणि जालन्यात भाजपने बहुमताचा आकडा गाठला आहे. परभणीत पहिल्यांदाच उध्दवसेनेचा भगवा फडकला असून लातूर महापालिकेवर कॉँग्रेसचा झेंडा फडकला आहे. राज्यातील २९ महापालिकांपैकी २५ महापालिकेवर भाजपने दणदणीत विजय मिळवित कमळाचा झंजावात असल्याचे दाखवून दिले आहे. उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या सत्तेला सुरूंग लावत, पवार काका पुतण्यांचाही धुव्वा उडविण्यात भाजप यशस्वी ठरले आहे. एकनाथ शिंदे यांनी शिंदेशाहीची शान राखली असल्याचे या निकालावरून स्पष्ट झाले आहे. लातूर, परभणी, चंद्रपूर आणि मालेगाव वगळता इतर सर्व महापालिका आता भाजपच्या ताब्यात गेल्या आहेत.

### ● विकासाच्या अजेंड्याला मुंबईकरांची साथ – देवेंद्र फडणवीस

२९ पैकी किमान २६ महापालिकांवर भाजपचा झेंडा फडकला आहे, असे सांगत राज्यातील जनतेने दिलेला हा अभुतपूर्व कौल आहे. राज्यातील सर्व जनतेचे मी आभार मानतो. मुंबईत आमच्या विकासाच्या अजेंड्याला मुंबईकरांनी साथ दिली आहे. विजयाचा कोणीही उन्माद करू नये. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी उध्दव ठाकरे यांनी प्रातारणा केल्यामुळेच त्यांच्यावर आज ही वेळ आली आहे, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# डॉ प्रमोद शिंदे यांची आय. एम. ए. राज्य समितीवर नियुक्ती



बीड । प्रतिनिधी

येथील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ.प्रमोद शिंदे यांची महाराष्ट्र राज्य इंडियन मेडिकल असोसिएशन च्या रस्ता अपघात व आपत्कालीन मदत या समितीवर ज्येष्ठ मार्गदर्शक व कार्यकारणी सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आय एम ए चे राज्य अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी यांनी सदर नियुक्ती केली आहे. सदर समिती रस्त्यावरील अपघात ग्रस्तांना तात्काळ मदत करणे, तसेच आपत्कालीन वैद्यकीय मदत करणे, जीवित हानी कमी करणे इत्यादी बाबीवर डॉक्टर्स पॅरामेडिकल तसेच सामान्य जनता यांचे प्रशिक्षण, जनजागृती यावर काम करेल. महाराष्ट्रात रस्ते अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे होणाऱ्या जखमा, जीवितहानी आणि येणारे अपंगत्व कमी करण्यासाठी सदर समिती विश्लेषण व मार्गदर्शन करेल. निश्चितच याद्वारे रुग्णांचे जीव वाचून अपघात रस्त्यांना वेळेवर मदत करण्यास जनजागृती होईल .डॉ. प्रमोद शिंदे हे बीड मधील सह्याद्री ऑर्थो केअर हॉस्पिटल चे संचालक,ज्येष्ठ अस्थिरोग तज्ञ असून यापूर्वी त्यांनी महाराष्ट्र अस्थिरोग संघटना राज्य उपाध्यक्ष, आय एम ए बीड सचिव, बीड अस्थिरोग संघटना अध्यक्ष इत्यादी विविध पदावर काम केलेले आहे. उत्कृष्ट कामाबद्दल त्यांचा राज्य पातळीवर गौरव झालेला आहे. सदर समिती मध्ये नियुक्ती बद्दल त्यांचे आय एम ए महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी, राज्यसचिव डॉ. विक्रांत देसाई, आय एम ए बीड अध्यक्ष डॉ. अनंत मुळे , डॉ. सचिन आंधळकर, डॉ टी एल देशमुख,डॉ. एस वाय जाधव व सर्व सदस्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# 'शासन थेट गावाच्या उंबरठ्यावर' — नागापूर खूर्द येथे महसूल मंडळ स्तरीय आढावा बैठक

## तहसीलदार शेळके यांचा शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांना दिलासा

बीड । प्रतिनिधी

नागापूर खूर्द ( ता . बीड ) येथे शुक्रवार दिनांक १६ रोजी आयोजित करण्यात आलेली महसूल मंडळ स्तरीय आढावा बैठक ही केवळ प्रशासकीय औपचारिकता न राहता , थेट नागरिकांच्या प्रश्नांना हात घालणारी आणि शासन आपल्या दारी या संकल्पनेला मूर्त स्वरूप देणारी लोकाभिमुख संवादसभा ठरली . दिनांक १६ जानेवारी रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत शासन , प्रशासन आणि सामान्य जनता यांच्यातील अंतर लक्षणीयरीत्या कमी झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले .



राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभाग अधिक गतिमान , पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्याच्या दिशेने शासनस्तरावरून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत . त्याच अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर हे विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये महसूल यंत्रणेला सतर्क ठेवत वेळोवेळी आढावा बैठका , तपासणी दौरे व स्पष्ट सूचना देत आहेत . त्यांच्या या मार्गदर्शक धोरणांचा परिणाम बीड तालुक्यातील नागापूर खूर्द येथील या बैठकीत प्रकर्षाने दिसून आला .

या बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पिक नुकसानीबाबत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाची सविस्तर माहिती उपस्थित शेतकऱ्यांना देण्यात आली . ई – पिक नोंदणी , ई – पिक पाहणीचे महत्त्व , नुकसान भरपाईसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे , आधार कार्ड अद्ययावत ठेवण्याची ▶ उर्वरित पान २ वर



# श्री वैकुंठवासी हरिभक्त परायण ज्योतिष्य विशारद बन्सी महाराज दायमा यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात कुक्कडगाव येथे साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील सर्वात अग्रेसर असलेले कुकडगाव या ठिकाणी हरिभक्त परायण ज्योतिष्य विशारद श्री बन्सी महाराज दयमा यांची २४ वी पुण्यतिथी मोठ्या उत्साहामध्ये आज संपन्न झाली त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त श्री दत्त मंदिर संस्थान या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन श्री हरिभक्त परायण गोवर्धन महाराज पवार यांच्या वतीने करण्यात आले होते यामध्ये श्री हरी किर्तन सकाळी अकरा ते एक या दरम्यान हरिभक्त परायण श्री पुरुषोत्तम महाराज मस्के यांचे सुश्राव्य असे वेदांत व्याकरणावर कीर्तन संपन्न झाले त्यांनी अनेक भाविक भक्तांचे या ठिकाणी उपस्थित असलेल्या मन जिंकले व सर्वांना मंत्रमुग्ध केले अतिशय उत्कृष्ट आणि अप्रतिम वेदांताचा अभ्यास असणारे महाराज या कीर्तनाला लाभल्यामुळे सर्व भाविक भक्तांमधून या ठिकाणी समाधान भाविक ▶ उर्वरित पान २ वर






*ॲड.गोविंद शिराळे यांची नगरसेवक म्हणून निवड झाल्याबद्दल सत्कार करून शुभेच्छा देताना या प्रसंगी भापनेते नवनाथ आण्णा शिराळे,अविनाश पवार.रूषिकेश पांडव. अभिजित भालेकर प्रतिक भालेकर ओमकार बेंडसुरे शुभेच्छा देताना श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान चे धारकरी.*

# नवनाथांचे जीवन गोरगरीबांच्या कल्याणासाठी समर्पित -ह.भ.प.संतोष महाराज आढावणे

## कीर्तन सेवेतून गोरक्षनाथ टेकडी परिसर भक्तीमय

बीड । प्रतिनिधी

गुरु मच्छिंद्रनाथ बाबा यांच्यापासून सुरू झालेल्या नाथ संप्रदायाने गुरु गोरक्षनाथ, गुरु साधूबाबा महाराज, गुरु किसन बाबा महाराज आणि सध्याचे गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्यापर्यंत अखंड अशी परंपरा जपली आहे. या नाथपरंपरेने आपले संपूर्ण आयुष्य साधना, तपस्या आणि सेवा यांतून गोरगरीब, वंचित व पीडितांच्या कल्याणासाठी अर्पण केले आहे, असे प्रतिपादन ह. भ. प. संतोष महाराज आढावणे यांनी केले. अभंग विवेचनाच्या माध्यमातून बोलताना त्यांनी सांगितले की, दुःखी व पीडित जनांच्या जीवनात सुखाची ज्योत पेटावी, त्यांचे दुःख दूर होऊन सुखाचा अनुभव मिळावा, यासाठी नाथ संप्रदायाने अथांग कष्ट घेत स्वतःचे आयुष्य समाजसेवेसाठी वेचले आहे. संतांचे कार्य हे केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नसून, ते सामान्य माणसाच्या संसारिक जीवनाला सुखकर बनवणारे आहे.



### संतपरंपरेचा समाजावर सकारात्मक प्रभाव

वारकरी संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांनी आपल्या साधना व तपश्चर्येच्या बळावर वंचित, पीडित व कष्टकरी समाजाच्या कल्याणासाठी मोठे योगदान दिले आहे. संतांचे विचार आणि कार्य यामुळे समाजात समता, बंधुता व करुणेची भावना निर्माण झाली आहे, असेही संतोष महाराज आढावणे यांनी नमूद केले.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे भव्य रूप प्रेरणादायी

गुरुवर्य किसन बाबा महाराज आणि गुरुवर्य शांतिब्रह्म नवनाथ बाबा महाराज यांच्यावर अपार श्रद्धा असलेल्या भाविक भक्तांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. या ऊर्जेतूनच श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भव्य व दिव्य स्वरूप साकार झाले असून, हे स्थळ संपूर्ण महाराष्ट्राला दिशा देणारे आहे. भाविक भक्तांनी स्वखर्चातून उभारलेला भव्य सभामंडप अत्यंत स्फूर्तीदायी असल्याचे त्यांनी सांगितले.

### कीर्तनातून भक्तिभावाचे दर्शन

या प्रसंगी ह.भ.प.संतोष महाराज आढावणे यांनी कीर्तनरूपी सेवा अर्पण केली. त्यांना गायनाचार्य, मृदंगाचार्य, टाळकरी, माळकरी, विणेकरी आणि भजनी मंडळी यांनी उत्तम साथ दिली. कार्यक्रमाला भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# निवडणुका.... गोंधळ, भांडणे आणि बोगस मतदान : लोकशाहीच्या मूल्यांवर होत असलेला घाला

लोकशाही व्यवस्थेचा आत्मा म्हणजे निवडणुका. जनतेला आपल्या प्रतिनिधींची निवड करण्याचा हक्क देणारी ही प्रक्रिया देशाच्या राजकीय, सामाजिक आणि आर्थिक भवितव्याची दिशा ठरवते. निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव असे म्हटले जाते; परंतु आजच्या काळात हा उत्सव अनेक ठिकाणी गोंधळ, भांडणे, हिंसाचार, आरोप–प्रत्यारोप आणि बोगस मतदानाने विद्रूप होताना दिसतो. ही परिस्थिती केवळ चिंताजनकच नाही, तर लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारी आहे.

निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय वातावरण तापू लागते. प्रचाराच्या नावाखाली सभ्यता आणि नैतिकतेच्या मर्यादा ओलांडल्या जातात. विकास, रोजगार, शिक्षण, आरोग्य, शेतकरी प्रश्न यांसारख्या ज्वलंत मुद्द्यांऐवजी जातीधर्माचे राजकारण, भावनिक मुद्द्यांचे भांडवल आणि खोट्या आश्वासनांचा मारा सुरू होतो. सोशल मीडियावरून अफवा, चुकीची माहिती आणि द्वेषमूलक संदेश पसरवले जातात, ज्यामुळे समाजात तेढ निर्माण होते.




या तेढीचे रूपांतर अनेकदा प्रत्यक्ष भांडणे, मारामाऱ्या आणि हिंसाचारात होते. निवडणूक काळात राजकीय कार्यकर्त्यांमध्ये संघर्ष, मतदान केंद्रांवर गोंधळ, दगडफेक, तोडफोड अशा घटना वारंवार घडताना दिसतात. शांततेत मतदान करण्याचा नागरिकांचा मूलभूत हक्क यामुळे धोक्यात येतो. भीतीच्या वातावरणामुळे अनेक मतदार मतदान केंद्रापर्यंत जाणे टाळतात, ज्याचा परिणाम लोकशाही सहभागावर होतो. निवडणुकांतील आणखी एक गंभीर आणि कळीचा मुद्दा म्हणजे बोगस मतदान. मृत व्यक्तींच्या नावावर मतदान, बनावट ओळखपत्रांचा वापर, एका व्यक्तीने एकापेक्षा अधिक वेळा मतदान करणे, दबावाखाली किंवा पैशाच्या आमिषाने मत देण्यास भाग पाडणे असे प्रकार निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता कमी करतात. अशा गैरप्रकारांमुळे निवडणूक यंत्रणा, प्रशासन आणि संपूर्ण लोकशाही व्यवस्थेवर जनतेचा विश्वास डळमळीत होतो.

बोगस मतदानाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे जनमताचा अपमान. खऱ्या मतदारांचा आवाज दबला जातो आणि निवडून येणारे प्रतिनिधी खरोखरच जनतेचे प्रतिनिधित्व करतात का, हा प्रश्न निर्माण होतो. लोकशाहीत बहुमताला महत्त्व असते, पण ते बहुमत जर फसवणुकीतून तयार झाले असेल, तर ती लोकशाही केवळ नावापुरती उरते.

अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. स्वतंत्र, निष्पक्ष आणि कठोर निर्णय घेणारा निवडणूक आयोगच या गोंधळावर नियंत्रण ठेवू शकतो. अद्ययावत मतदार याद्या, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सीसीटीव्ही निरीक्षण, वेळीच कारवाई आणि कडक शिक्षा या उपायांमुळे गैरप्रकारांना आळा घालता येऊ शकतो. पोलीस प्रशासन आणि न्यायव्यवस्थेनेही राजकीय दबावाला बळी न पडता कायद्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

मात्र केवळ यंत्रणांवर जबाबदारी टाकून चालणार नाही. राजकीय पक्ष आणि उमेदवारांनीही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. सत्तेसाठी समाजात फूट पाडणे, हिंसाचाराला खतपाणी घालणे आणि फसवणुकीचा मार्ग अवलंबणे हे लोकशाहीला घातक आहे. स्वच्छ, सकारात्मक आणि मुद्देसूद प्रचार ही काळाची गरज आहे.

तितकीच महत्त्वाची भूमिका मतदारांची आहे. सजग, जागरूक आणि निर्भय मतदारच लोकशाही मजबूत करू शकतो. पैशाच्या, दारूच्या किंवा खोट्या आश्वासनांच्या आमिषाला बळी न पडता विवेकबुद्धीने मतदान करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मतदानाचा हक्क हा केवळ अधिकार नसून लोकशाही जपण्याचे कर्तव्य आहे.

निवडणुका म्हणजे गोंधळ, भांडणे आणि बोगस मतदान नव्हे, तर जनतेच्या इच्छेचा सन्मान करण्याची पवित्र प्रक्रिया आहे. या प्रक्रियेची शुचिता राखली गेली, तरच लोकशाही टिकेल आणि बळकट होईल. अन्यथा निवडणुका लोकशाहीचा उत्सव न राहता लोकशाहीच्या अधःपतनाचे कारण ठरतील, ही बाब आपण सर्वांनी गांभीर्याने समजून घेणे अत्यावश्यक आहे.

**– शबनम मुजीब खान**
**छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद**

## महापालिका निवडणुकीतही पुन्हा तोच गोंधळ

राज्यातील २९ महापालिकांसाठी मतदान यंदा गोंधळातच पार पडले. तब्बल ८ वर्षानंतर निवडणूक लागल्याने यंदा मुंबई–ठाणे वगळता मतदारांमध्ये कमालीचा उत्साह होता. मतदानाचा टक्का वाढावा यासाठी सरकारसह, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, मंडळे तसेच राजकीय पक्षांनीही यंदा बरेच परिश्रम केले. मतदान वाढावे यासाठी सामाजिक माध्यमे तसेच तंत्रज्ञानाचाही पुरेपूर वापर करण्यात आला होता, सामान्य नागरिकांनीही आपल्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवरून आपल्या मित्र मंडळींना, फॉलोअर्सना मतदान करण्याचे आवाहन केले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात जागृती करूनही दरवेळेस जे होते ते यावेळेसही झाले. मुंबईतील मतदानाचा टक्का काही वाढला नाही. लोकसभा, विधानसभा यानंतर आता महापालिका निवडणुकांतही निवडणूक आयोगाच्या ढिसाळ कारभारामुळे मतदारांचे नाहक हाल झाले. महापालिका वार्डांच्या पुनर्रचनेमुळे कितीतरी मतदारांची नावे विभागली गेली. ज्यामुळे मतदारांना आपली नावे शोधण्यासाठी एका मतदान केंद्रावरून दुसऱ्या मतदान केंद्रावर फेऱ्या माराव्या लागत होत्या. कित्येक मतदारांची नावे मतदार याद्यांमधून गायब झाली होती. मुंबईतील घर भाड्याने देऊन राहण्यासाठी मुंबई बाहेर गेलेले अनेक जण मतदानासाठी मुंबईत आले होते. अशांपैकी अनेकांची नावे मतदार यादीतून गायब झाल्याने त्यांना मतदान न करताच परतावे लागले. घरातील ४ सदस्यांपैकी एका सदस्याचे नाव मतदार याद्यांतून गायब झाल्याने ते शोधण्यामध्ये राजकीय पक्षांच्या बुथवर बसलेल्यांची दमछाक होत होती. एकेकाचे नाव शोधण्यात बराच वेळ लागत असल्याने अनेक बुथवर नागरिकांचे मोठे घोळके झाल्याचे चित्र पाहायला मिळत होते. विशेष म्हणजे ज्यांनी विधानसभा निवडणुकीला मतदान केले अशांचीही नावे काही ठिकाणी लुप्त झाली होती. अनेक ठिकाणी मृत व्यक्तींची नावे मतदार याद्यांत पुन्हा समाविष्ट झालेली पाहायला मिळत होती. निवडणूका दर वर्षी होत नसल्या तरी निवडणूक आयोग निवडणूक जवळ आल्यावरच जागे होते का ? भारतात प्रत्येकाचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, बँकेतील खाती सरकारने एकमेकांशी लिंक करून घेतली आहेत. एकदा नोंदवलेली नावे अन्य कोणत्याही ठिकाणाहून लुप्त होत नाहीत मग मतदार याद्यांमधूनच ती कशी गायब होतात ? मृत व्यक्तीची सरकार दरबारी नोंद करणे आता सर्वत्र अनिवार्य करण्यात आले आहे. मृत व्यक्तीचे मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र निघाल्यावरही मतदार याद्यांमधून ते नाव का काढले जात नाही किंवा एकदा काढलेले नाव पुढच्या निवडणुकीच्या वेळी यादीमध्ये कसे काय जोडले जाते ? निवडणूक जाहीर होण्यापूर्वी मतदार याद्या अद्यावत करण्याचे काम कोणाचे आहे ? विधानसभा निवडणुका झाल्यानंतर महापालिकेच्या निवडणुका जाहीर होण्यात बराच कालावधी होता. या काळात याद्या अद्यावत का करण्यात आल्या नाहीत असा संतप्त सवाल मतदारांच्या मनात निर्माण होताना दिसला. शहरांत दरवेळी मतदानाची वेळ सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत असते. यंदा सकाळी आणि संध्याकाळी दोन्ही ठिकाणी अर्धा अर्धा तास कमी केल्याचे अनेकांना ज्ञात नव्हते त्यामुळे मतदान करून सकाळी लवकर कामावर जाणाऱ्यांसह नागरिकांना मतदान केंद्रांवर सकाळी अर्धा तास विनाकारण तिष्ठत राहावे लागले. वेळेचे गणित बिघडल्याने काहीजण मतदान न करताच कामावर जाताना दिसले. हीच स्थिती सायंकाळी पाहायला मिळाली. साडेपाचनंतर धावत पळत मतदान केंद्रांवर जाणाऱ्यांना मतदान न करताच परतावे लागले. दुबार मतदारांमुळे अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती झालेली पाहायला मिळाली. या निवडणुकीत मतदान यंत्राच्या शेजारी व्हीव्हीपॅट यंत्र पाहायला न मिळाल्याने आपले मत नक्की आपल्या उमेदवारालाच गेले आहे कि अन्य कोणाला असा प्रश्न मतदारांना पडत होता. अनेक ठिकाणी निवडणूक कर्मचारी कामात मुद्दामहून दिरंगाई करताना दिसून आले ज्यामुळे मतदान अत्यंत धीम्या गतीने होत होते अशा ठिकाणी मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळाल्या ज्यामुळेही काही मतदार मतदान न करताच मागे फिरकताना पाहायला मिळाले. आपल्या जिल्ह्याचे भवितव्य ठरवणारी निवडणूक निर्विघ्न पार पडावी, नागरिकांनी या प्रक्रियेत एकदिलाने सहभाग घ्यावा यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जातो; मात्र प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि नागरिकांचा निरुत्साह यांमुळे हे गणित कधी साधलेच जात नाही. नागरिकांना पुन्हा पुन्हा आव्हान करूनही नागरिक आपली नावे मतदार याद्यांमध्ये आहेत कि नाही याबाबत आधीच खात्री करून घेत नाहीत. शहरासारख्या ठिकाणी आज प्रत्येकाच्या हातात स्मार्ट फोन आहे. निवडणूक याद्यांमध्ये आपले नाव पडताळण्याची पद्धतसुद्धा प्रशासनाने अत्यंत सोपी केली आहे, तरीही नागरिक मतदार यादीतील आपले नाव शोधण्याचा प्रकार ऐन निवडणुकीच्या दिवशी करतात ज्यामुळे त्यांनाही हाल सहन करावे लागतात. केवळ मतदारांना मतदान करण्यास उद्युक्त करणे पुरेसे नसून घरोघरी जाऊन घरातील सर्व प्रौढ व्यक्तींची नावे मतदार याद्यांमध्ये समाविष्ट आहेत का ? घरातील मृत व्यक्तींची नावे याद्यांतून काढली गेली आहेत का ? नवीन मतदारांची नावे याद्यांमध्ये समाविष्ट झाली आहेत का ? या सर्व पडताळण्या निवडणुकीच्या आधी व्हायला हव्यात त्यासाठी निवडणूक प्रशासनाने स्वयंसेवी संघटना आणि राजकीय पक्ष यांचे साहाय्य घ्यायला हवे. निवडणूक केंद्राच्या ठिकाणी मतदारांसाठी आवश्यक सुविधा करण्यात आल्या आहेत ना ? ज्या ठिकाणी लोडशेडिंग केली जाते अशा केंद्रांमध्ये जनरेटर आदी व्यवस्था केलेल्या असाव्यात. सर्व मतदान केंद्रामध्ये पुरेशा सुविधांची उपलब्धता केल्याची खात्री प्रमुख पक्षांच्या स्थानिक प्रतिनिधींकडूनही आदल्या दिवशी करून घेतली जावी. यंदाच्या महापालिका निवडणूक प्रक्रियेतून निवडणूक प्रशासन, राजकीय पक्षांसह नागरिकांनीही बोध घेऊन त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

**–जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

◆ पान 9 वरून पुढे...

## 'शासन थेट...

आवश्यकता, तसेच शासनाकडून मिळणाऱ्या थेट लाभ योजनांची माहिती सविस्तरपणे समजावून सांगण्यात आली. अनेक शेतकऱ्यांच्या शंका, अडचणी आणि तक्रारींवर तहसीलदार शेळके यांनी प्रत्यक्ष संवाद साधत मार्गदर्शन केले. शेती, महसूल आणि ग्रामविकास या तिन्ही घटकांचा समन्वय साधूनच खऱ्या अर्थाने ग्रामीण विकास साध्य होऊ शकतो, ही भूमिका या बैठकीत अधोरेखित झाली. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात प्रशासन अधिक कार्यक्षम करण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. रोजगार हमी योजना, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेला सेवा मित्र उपक्रम, विविध शासकीय प्रमाणपत्रांचे सुलभ वितरण, जमिनीच्या महसुली वसुलीचे नियोजन, घरकुल योजनांसाठी आवश्यक असलेले वाळू वाटप, या सर्व विषयांवर या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक हे वेळोवेळी उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांकडून योजनांचा आढावा घेत असून, प्रशासनाच्या कामकाजात शिस्त, वेळेचे पालन आणि परिणामकारक अंमलबजावणी यावर विशेष भर देत आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांचा मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांवर सातत्याने तगादा असून, नागरिकांची कामे प्रलंबित राहू नयेत, यासाठी ते नियमित पाठपुरावा करत आहेत. याच प्रशासकीय साखळीचा एक भाग म्हणून नागापूर खूर्द येथे ही आढावा बैठक घेण्यात आली.

बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या तालुक्यातील विविध गावांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांच्या समस्या समजून घेत असून, महिला, बालक, शिक्षण, सामाजिक प्रश्न यावर विशेष लक्ष देत आहेत. बालविवाह रोखण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या जनजागृती मोहिमेचा या बैठकीत विशेष उल्लेख करण्यात आला. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सर्व ग्रामपंचायतींना स्पष्ट निर्देश देत सांगितले की, प्रत्येक ग्रामसभेत बालविवाह होणार नाहीत, याबाबत ठराव घेण्यात यावा आणि समाजातील प्रत्येक घटकाने यासाठी सजग भूमिका घ्यावी. याशिवाय प्रत्येक गावात वृक्षारोपण करण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरण संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे तहसीलदार शेळके यांनी स्पष्ट केले. मुला – मुलींना शिकवा हा संदेश देत विद्यार्थ्यांनी शिक्षणाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, तसेच पालकांनी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक ते सहकार्य करावे, असे आवर्जून सांगण्यात आले. शिक्षण, पर्यावरण आणि सामाजिक जबाबदारी या तिन्ही बाबींचा समतोल साधण्याचा प्रशासनाचा प्रयत्न या बैठकीतून दिसून आला. बैठकीदरम्यान ग्रामस्थांनी मांडलेल्या विविध अडचणी

◆ पान 9 वरून पुढे...

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शांतपणे ऐकून घेतल्या. अनेक प्रश्नांवर जागच्या जागी मार्गदर्शन देत काही विषयांवर तात्काळ तोडगे सुचविण्यात आले. त्यामुळे नागरिकांना तालुका किंवा जिल्हा मुख्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची गरज भासली नाही. शासन आपल्या दारी हा उपक्रम येथे केवळ घोषणेत न राहता प्रत्यक्ष कृतीतून साकार झाल्याची भावना उपस्थित नागरिकांमध्ये दिसून आली.

एका शेतकऱ्याने समाधान व्यक्त करत सांगितले की, आमचे प्रश्न गावातच ऐकून घेतले जात आहेत, हीच खरी दिलासा देणारी बाब आहे. तर ग्रामपंचायत प्रतिनिधींनी, अशा बैठकींमुळे प्रशासन आणि नागरिकांमधील अंतर कमी होते, विश्वास वाढतो आणि कामकाजात पारदर्शकता येते, असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मंडळ अधिकारी वंदना विघ्ने, ग्राम महसूल अधिकारी काजल ससाने, ज्योती बोधवड, सुरेश ठाकूर, परमेश्वर काकडे, शाळेचे मुख्याध्यापक, नागापूर खूर्दच्या सरपंच सुमेधा साळुंखे, नागापूर बु. चे सरपंच किशोर ढोकणे, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच, नागापूर खूर्द येथे झालेली ही महसूल मंडळ स्तरीय आढावा बैठक म्हणजे राज्य शासनाच्या धोरणात्मक दिशेचा, विभागीय व जिल्हास्तरीय मार्गदर्शनाचा आणि तालुकास्तरावरील संवेदनशील अंमलबजावणीचा सुंदर संगम ठरली. प्रशासनाची तत्परता, निर्णयक्षमता आणि लोकांचा वाढता विश्वास याचे हे जिवंत उदाहरण असल्याचे बोलले जात आहे.

## श्री वैकुंठवासी...

भक्तांच्या चेहऱ्यावर दिसून आले हरी कीर्तना नंतर हरिभक्त परायण गोवर्धन महाराज दत्त संस्थान कुक्कडगाव यांच्या वतीने पंचक्रोशीतील व कुकडगाव ग्रामस्थांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते आणि सायंकाळी संगीत भजनानी या पुण्यतिथीची सांगता झाली यावेळी शेकडो भाविक भक्त कीर्तनासाठी व महाप्रसादासाठी व संगीत भजनासाठी कुकडगाव श्री दत्त मंदिर संस्थान या ठिकाणी उपस्थित होते हरिभक्त परायण गोवर्धन महाराज पवार यांनी मंदिराच्या वतीने केली हरिभक्त परायण श्री ज्योतिष विशारद बन्सी महाराज दयमा यांनी सर्व भाविक भक्तांसाठी या ठिकाणी श्री दत्त मंदिर स्थापन करून ठेवल्यामुळे देखील सर्व भाविक भक्तांमध्ये एक भक्तिमय वातावरण दिसून आले बन्सी महाराज असताना त्यांनी अनेक लोकांना चांगल्या प्रकारे धार्मिक उपदेश करून अनेक भाविक भक्तांना त्यांनी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन केले भगवंताचे नामस्मरण केल्याने उद्धार होतो असा संदेश देखील महाराज असताना सर्व भाविक भक्तांना दिल्यामुळे प्रतिदिवशी तसेच दत्त जयंती दिवशी देखील भाविक भक्त मंदिरामध्ये आवर्जून श्री गुरुदत्तात्रेय यांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात म्हणून महाराजांच्या या उत्कृष्ट त्यांनी केलेल्या धार्मिक उपक्रमाचे देखील सर्व भाविक भक्त यांच्यामधून एक आनंदमय व भक्तिमय समाधान व्यक्त होत आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## तलवाडा येथील....

१०/६/२०२५ रोजी, १५/७/२०२५ रोजी, ६/८/२०२५ रोजी मा जिल्हाधिकारी कार्यालय बीड, मा मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब जिल्हा परिषद बीड, आणि पंचायत समिती गेवराई याना सरकारी गायरान जमिनीमधील असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगट असणारे बेकायदेशीर रित्या केलेले अतिक्रमण काढणे बाबत वारंवार निवेदने दिली होती. त्या त्या निवेदनाला आणुसरुन आम्हाला आतिक्रमण काढण्यात येईल आसे लेखी आश्वासन देऊन आमचे जलसमाधी आंदोलन स्थगित करण्यास आम्हाला भाग पाढल्या गेले. पण आज पर्यंत कोणतीही कारवाई न केल्यामुळे आम्ही परत दिनांक २६/१/२०२६ रोजी जलसमाधी घेणार याची शासन व प्रशासनाने नोंद घ्यावी. अनाधिकृत बांधकाम स्वत काढून घेणे बाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती गेवराई यांचे पत्र क्रमांक जा.क. २६२८ दिनांक १८/०७/२०२५ नुसार आले असता गाव तलाव संरक्षण भिंतीलगतच्या सर्व अतिक्रमणधारकास पहिली नोटीस दिनांक ११/०८/२०२५ रोजी तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब यांनी काढली होती व नंतर १५/९/२०२५ रोजी दुसरी नोटीस काढली पण तिसरी व अंतिम सात दिवसांची नोटीस देण्यास टाळाटाळ करण्यात आली व आमचे १५ ऑगस्ट आणि १७ सप्टेंबर रोजीचे जलसमाधी आंदोलन अतिक्रमण काढू म्हणून स्थगित करण्यात आले होते. आतिक्रमण धारकांना दिलेल्या नोटीसांच्या आणुषंगाने अतिक्रमण काढणे बंधनकारक असताना देखील टाळाटाळ करण्यात आल्यामुळे मी शेख

◆ पान ४ वरून पुढे...

खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने आम्ही दोघांनी मिळून असा नाईलाजाने निर्णय घेतला आहे की आम्ही दिनांक २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनी पुन्हा तलवाडा येथील सरकारी गायरान जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावात स्थानिय प्रशासकीय अधिकाऱ्याच्या वेळकाढूपणामुळे जलसमाधी आदोलन करणार आहोत. आमच्या जीवितास कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही प्रशासनाची राहील त्यातल्या त्यात तलवाडा ग्रामपंचायतचे प्रशासक चोपडे साहेब व ग्रामसेवक मुसळे साहेब आणि गटविकास अधिकारी सानप साहेब यांची राहील, आसा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास निवेदन देऊन दिला आहे.

## स्पर्धा परीक्षा...

सुभाष सानप यांनी केले. रविवार (११ जानेवारी) रोजी बीड येथील धानोरा रोड भागात प्रा.अशोक गायकवाड व प्रो.डॉ.राणी जाधव–गायकवाड यांच्या मोफत प्रियदर्शी बहुजनवादी मिशन स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यासिका केंद्राचे उद्घाटन मा.सुभाष सानप सहा.पोलीस निरीक्षक, वाहतूक शाखा बीड.यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचबरोबर या ठिकाणी प्रियदर्शी मोफत वाचनालय देखील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध होणार आहे. या आधी देखील गायकवाड दांपत्यांनी विहार तिथे वाचनालय,करोना काळामध्ये मध्ये १०० कुटुंबाना अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तूंचे किटचे वाटप, १००० बुद्ध आणि धम्म या ग्रंथाचे वाटप, गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि आर्थिक मदत शालेय विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचीगोडी

◆ पान ४ वरून पुढे...

लागावी म्हणून चित्रकला स्पर्धा निबंध स्पर्धाचे आयोजन स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांसाठी दररोज दिनविशेष उपक्रम असे त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत आणि आता हा उपक्रम सुरू करून प्रा.अशोक गायकवाड आणि प्रो. डॉ.राणी जाधव– गायकवाड यांनी सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष से. नि मुख्यकार्यकारीअधिकारी पी.व्ही. बनसोडे, प्रमुख पाहुणे म्हणून दिलीप तरकसे, अशोक ठोकळ, होते जी.एम भोले, उपप्राचार्य उत्तम साळवे, कल्याण भंडारे, बि.डी तांगडे, सूर्यकांत जोगदंड, मस्के, वैशालीई शिंदे, तेजस वडमारे, के एस वाघमारे, अंकुश कोरडे, दादाराव गायकवाड, संतोष निकाळजे, रवी किरण जाधव, विद्या जाधव हे उपस्थित होते. पुढे बोलताना सानप यांनी स्पर्धा परिक्षेत मार्गदर्शन आणि अभ्यासातील सातत्य या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.अशोक गायकवाड सुत्रसंचलन किशोर वाघमारे यांनी तर आभार प्रो.डॉ. राणी जाधव –गायकवाड यांनी केले.

## डॉ. आदित्य...

सुमती भारती, अनंत रुद्रवार, गोविंद बजाज, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, उमेश मोगरेकर, बबनराव सरवदे,सुधीर नागापुरे, कमलेश जाब्रस दिनकर शिंदे दत्ता येवले यांनी अभिनंदन केले आहे.

## माजी आ.भीमराव...

राम कथेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून मानवी जीवनामध्ये सत्य,संयम,कष्ट, परिश्रम माणुसकी, मानवता, एकोपा, ऐक्य आणि

◆ पान ४ वरून पुढे...

सर्वधर्मसमभाव ही मूल्य मौल्यवान असतात.या मूल्याला अधोरेखित करण्याचे काम अर्थातच धर्म करीत असतो. त्या अनुषंगाने मानवता वादाचा सर्वांनी पुरस्कार करून अशा कथा निरूपणाला आवर्जून उपस्थित राहण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. यावेळी सौ प्राजक्ताताई धस, शैलजा थोरवे, सुखलाल मुथा, दिनकरराव तांदळे,अशोकदेवा जोशी, माजी सरपंच नामदेव राऊत, डॉ. मधुकर हंबर्डे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, प्रफुल्ल सहस्रबुद्धे,उत्तम बोडखे,प्रवीण पोकळे,सचिन रानडे,शरद रेडेकर,हौसराव आजबे,सतीशशेठ धस आदि सामाजिक, राजकीय, धार्मिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## कापूस आयात...

आंदोलन छेडेल व शेतकरी रस्त्यावर उतरण्यास भाग पाडले जातील, असा इशारा मोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे. भारत हा कृषीप्रधान देश असून, शेतीवर आधारित अर्थव्यवस्थेचा कणा शेतकरी आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांचे हित न पाहता शेतकऱ्यांचे हित जपण्याची जबाबदारी सरकारची आहे. कापसावरील सध्याचे ११ टक्के आयात शुल्क माफ न करता ते वाढवून किमान २२ टक्के करण्यात यावे, अशी ठाम मागणी शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे.जर सरकारने पुन्हा कापूस आयात शुल्कात सूट लागू केली, तर शेतकरी रस्त्यावर उतरण्याशिवाय पर्याय राहणार नाही, याची गंभीर दखल सरकारने घ्यावी, असा इशारा शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे यांनी दिला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com



श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण, मठाधिपती मा.हा.भ.प.श्री.डोंगरे महाराज यांच्या हस्ते,शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हा चिटणीस (प्रमुख )पदी मा.बापूसाहेब सोळुंके यांची निवड झाल्याबद्दल आर्शिवाद देऊन सत्कार करून शुभेच्छा दिल्या या वेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा विभागीय सरचिटणीस मा.विनोद आप्पा इंगोले, बीड जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर बाप्पा कवचट, बीड जिल्हा उपाध्यक्ष सुमंत खांडे सर, बीड जिल्हा उपाध्यक्ष शाम गायकवाड, जिल्हा सरचिटणीस बंडु आप्पा कोलगडे, जिल्हा उपाध्यक्ष सरपंच बापूसाहेब मराडे,तालुका उपाध्यक्ष रवींद्र जोगदंड, बीड शहर अध्यक्ष दत्ता शेळके पाटील, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष महिला मराठवाडा अध्यक्ष सौ. प्राजक्ताताई डोंगरे मॅडम,अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती महिला बीड शहर अध्यक्ष सौ स्वातीताई सिरसाट मॅडम, मा.कल्याण माने सर,मा.सिरसागर साहेब,मा.धनवडे साहेब, विलास इंगोले, बाळासाहेब देवगुडे, उमेश शितोळे पाटील,अ.भा. मराठ महासंघाचे बीड तालुका उपाध्यक्ष शिवाजीराव हिंदुळे, विशाल मोरे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हा पदाधिकारी व अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती समिती व पदाधिकारी व महिला भगिनी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# शालेय विद्यार्थ्यांमध्ये आरोग्य जनजागृती करा : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये व त्यांच्या पालकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होणे आवश्यक असून त्यासाठी महिला बालविकास, शिक्षण विभाग आणि आरोग्य विभाग यांनी संयुक्तपणे ही जनजागृती करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. जिल्हा परिषदेच्या वेरुळ सभागृहात झालेल्या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, सहा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय मुळे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (माध्य.) आश्विनी लाठकर तसेच जिल्ह्यातील तालुकास्तरीय, प्राथ आरोग्य केंद्र स्तरीय वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, शालेय मुलांमध्ये आरोग्य विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांचे आरोग्य चांगले राहिल. त्यासाठी उत्तम दिनचर्या, वैयक्तिक स्वच्छता, आरोग्यदायी सवयी, व्यायाम, खेळ, झोप,पौष्टिक आहार याबाबत त्यांना ज्ञान देणे आवश्यक आहे. यासाठी आरोग्य यंत्रणेतील अधिकारी- कर्मचाऱ्यांनी वेळ द्यावा. शाळानिहाय कार्यक्रम आयोजीत करुन विद्यार्थ्यांमध्ये याबाबत जनजागृती करावी. त्यासाठी खाजगी डॉक्टर्सचाही सहभाग घ्यावा. आरोग्यक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी हा उपक्रम राबवावा,अ से निर्देश जिल्हाधिकारी स्वामी यांनी दिला.



# पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन शाश्वत शेतीसाठी वरदान ठरेल : मयंक गांधी

**आपलं काम आहे समजून लोकसहभाग वाढवा – जेष्ठ सनदी अधिकारी सुधी मोहंती यांचे ग्रामस्थांना आवाहन ; नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाचा ग्लोबल विकास ट्रस्ट व सन फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रारंभ**

**परळी वै. । प्रतिनिधी**

पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन या भागातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरेल. नदीचे खोलीकरण आणि रुंदीकरण होऊन त्यामध्ये ऋठ- केले जाणार असल्यामुळे करोडो लिटर पाणी जमिनीत साठवले जाईल. हेच पाणी नव्याने फळबाग लागवड करून त्यातून शेतकऱ्यांची आर्थिक समृद्धी साधण्यासाठी मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी केले तर मध्य प्रदेश सरकारचे माजी सचिव तथा ज्येष्ठ सनदी अधिकारी सुधी मोहंती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हटले की, शाश्वत शेतीतून शेतकऱ्यांची प्रगती व्हावी यासाठीची मयंक गांधी यांना प्रचंड तळमळ असून, ग्लोबल विकास ट्रस्ट ही संस्था ही या भागाला लाभलेले वरदान आहे. संस्थेकडून केल्या जाणाऱ्या कामांमध्ये लोकांनी उत्स्फूर्त लोकसहभाग नोंदवावा असे आवाहन त्यांनी केले. ग्लोबल विकास ट्रस्ट आणि सन फार्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पापनाशी नदीच्या खोलीकरण आणि रुंदीकरण कामाचा शुक्रवारी भव्य शुभारंभ करण्यात आला, याप्रसंगी ते बोलत होते. अंबाजोगाई आणि परळी तालुक्यातून वाहणाऱ्या पापनाशी नदीलगत असलेल्या राक्षसवाडी, बोधेगाव, कावळ्याची वाडी, परचुंडी आदी गावांना या अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. या गावांमध्ये शेतीचे नुकसान होण्यासोबतच भविष्यातील संभाव्य धोका लक्षात घेता ग्रामस्थांनी पापनाशी नदीचे पुनरुज्जीवन करण्याची मागणी ग्लोबल विकास ट्रस्टकडे केली होती. ग्रामस्थांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ग्लोबल विकास ट्रस्ट व सन फार्मा यांच्या वतीने शुक्रवार, दिनांक १६ जानेवारी रोजी पापनाशी नदीच्या खोलीकरण व रुंदीकरण कामाचा भव्य शुभारंभ करण्यात आला. चिचखंडी येथून उगम असलेल्या नदीचे ८ किलोमीटर पेक्षा जास्त रुंदीकरण आणि खोलीकरण करण्यात येणार आहे. याचबरोबर नदीमध्ये GRA म्हणजेच कूपनलिका (बोअर) घेतले जाणार असून त्याद्वारे करोडो लिटर पाणी भूगर्भात मुरविले जाणार आहे.



# राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा विकास होतो : प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर



**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के. महाविद्यालय, बीडचे २०२५-२६ चे राष्ट्रीय सेवा योजना शिबीराचे मौजे काकडहिरा ता.जि.बीड येथे मान्यवरांच्या हस्ते उद्धाटन दि.१५ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाले. याप्रसंगी नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे , डॉ. विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, सरपंच अमोल बागलाने, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्धाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना शिबीरातून व्यक्तीमत्व विकास होतो. समाजसेवेची आवड निर्माण होते. सांघीक जिवन जगण्याचा मुलमंत्र प्राप्त होतो. विद्यार्थ्यांनी ग्रामिण भागाशी संपर्क व संवाद या शिबीरादरम्यान करणे आवश्यक आहे. शिबीराच्या माध्यमातून जिवण उपयोगी संस्कार होत असतात म्हणून विद्यार्थ्यांनी तनमनाने या शिबीरामध्ये सहभाग नोंदवावा. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर आपले विचार व्यक्त करताना म्हणाले की, राष्ट्रीय योजना शिबीरामध्ये विद्यार्थी नवनविण ज्ञान व अनुभवाने संस्कारीत होत असतो.

## तृतीयपंथी व्यक्तींसाठी हेल्पलाईन

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

तृतीयपंथी व्यक्तींसाठी केंद्र सरकारने हेल्पलाइन तयार केली आहे. या हेल्पलाईनची सेवा विनामूल्य उपलब्ध असून १४४२७ हा या हेल्पलाईनचा क्रमांक आहे, सह सहायक आयुक्त समाजकल्याण आर.एम. शिंदे यांनी कळविले आहे.केंद्र सरकारच्या ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्काचे संरक्षण) कायदा,२०१९ व नियम २०२० संपूर्ण लागू देशात लागू झाले आहेत.



*दि १६.०१.२०२६ रोजी मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड अंतर्गत गाव काठोडा(मातोश्री कॅम्पस)ता.जि बीड या ठिकाणी राष्ट्रीय स्टार्टअप दिवस असल्याने एक नवीन संकल्प सुरुवात करण्यात आली. *एक झाड एक जीवन* अभियान ला सुरुवात करण्यात आली.व संस्थेचे सदस्य यांनी पर्यावरण संतुलीसाठी सर्वांना मार्गदर्शन केले.आणि रोजगार निर्मितीसाठी विविध उद्योग बद्दल माहिती दिली.यावेळी उपस्थित संस्थेचे तेजस पवार,रोहन डोळस, विशाल डोळस, किरण डोळस, सदस्य व गावकरी होते.*

# प्रमिलादेवी पाटील कला विज्ञान महाविद्यालय येथे भूगोल दिन साजरा

**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला विज्ञान महाविद्यालय, नेकनूर येथील भूगोल विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने १५ -१- २०२६ वार गुरुवार रोजी भूगोल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रम साठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ घोडके जे.व्हि.कला महाविद्यालय नांदूर घाट, प्रा. म्हस्के विजय. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डि.के. हे उपस्थित होते. सर्वप्रथम पृथ्वीगोलाचे मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक भूगोल विभाग प्रमुख डॉ. जाधव जे.के. यांनी केले याप्रसंगी बोलताना भूगोल दिन साजरा का करावा याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तर प्रमुख पाहुणे प्रा. डॉ घोडके जे.व्हि.मार्गदर्शन करताना म्हणाले की,भूगोल दिन साजरा केल्यामुळे विद्यार्थ्यांना सूर्य, चंद्र, तारे, ग्रह, भूकंप, जमीन, हवा, हवामान. याची माहिती झाली पाहेजे. सजीव सृष्टीवर जो घातक परिणाम होतो. त्यासाठी आपण भौतिक सुख सुविधांचा उपयोग करावा जेणेकरून पृथ्वीचा व पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची आपण सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. असे ते म्हणाले. तर अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ. ढास डि.के. म्हणाले की, पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी आपण सर्वांनी प्रदूषण रोखण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.



# पीएमश्री जी प मा शाळा पाली ची शैक्षणिक सहल संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहराच्या जवळ असलेल्या पीएमश्री जिल्हा परिषद माध्यमिक शाळा पाली ची शैक्षणिक सहल नुकतीच उत्स्फूर्तपणे संपन्न झाली.तीन एस टी बस मधून १३२ विद्यार्थी व १२ शिक्षक सहलीमध्ये सहभागी झाले होते. दिनांक ३० डिसेंबर २०२५ ते ३ जानेवारी २०२६ या कालावधीत ४ मुक्काम व ५ दिवसाची सहल प्रशाळेचे मुख्यध्यापक श्रीयुत लाड सर यांच्या मार्गदर्शनाखाली सहलप्रमुख श्रीयुत आघाव सर यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.शिर्डी येथील वॉटर पार्क मध्ये मुलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन सहलीची सुरुवात केली. ओझर च्या गणपती चे दर्शन घेऊन लेण्याद्री येथे पहिला मुक्काम केला.पहिल्या शतकातील कोरलेली लेणी व त्याचे सौन्दर्य पाहून मुलांनी आनंद लुटला.छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मस्थळ शिवनेरी किल्ला पाहून मुले भारावून गेली. महड चा गणपती ,पालीचा गणपती व जवळच असलेले निसर्गाच्या कुशीत वसलेले गरम पाण्याचे झरे असलेले उन्हेरे ,अरबी समुद्राचा विस्तीर्ण काशीद बीच चा समुद्र किनारा ,समुद्रात वसलेले किल्ला जंजिरा ,मुरुड चा समुद्र किनारा मुलांनी मनमोहक पद्धतीने न्याहाळत आनंद लुटला. ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मानवतावादी दृष्टीने महत्त्वाचा असलेला चवदार तळे सत्याग्रह या ठिकाणी भेट देऊन मनुस्मृती दहन झालेल्या ठिकाणी मुलांनी भेट दिली व या ठिकाणचे ऐतिहासिक महत्व समजून घेतले.



## जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत प्रज्ञाचक्षु अंध विद्यालयाचे मोठे यश

**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे झालेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेत बीड येथील प्रज्ञाचक्षु अंध विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नऊ सुवर्णपदके व दोन रौप्य पदके प्राप्त करुन शाळेस मोठे यश मिळवून दिले आहे. बीडच्या प्रज्ञाचक्षु अंध विद्यालयाचे नऊ खेळाडू सहभागी झाले होते विद्यालयाने दोन रोग्य पदके आणि नऊ सुवर्णपदके मिळवली. रोहन घोरपडे, सुशील डोळसे ,समर्थ खोमाड, विनोद धुमक ,हसन आली पठाण अबूजर, मुक्ता तौर, सुरजित ढोबळे या खेळाडूंनी २५ मीटर ५० मीटर धावणे स्पोर्ट जंप या खेळामध्ये प्राविण्य मिळवले आणि अंधप्रवर्गातील सर्वसाधारण विजेतेपद प्रज्ञाचे निवासी अंधविद्यालयास मिळाले.

# राष्ट्रीय खो-खो स्पर्धेत तुकाराम करांडेची झुंजार कामगिरी; बीड जिल्ह्याचा मान उंचावला

**बीड । प्रतिनिधी**

काझीपेठ (तेलंगणा) येथील रेल्वे ग्राऊंडवर पार पडलेली ५८ वी वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धा शेवटच्या क्षणापर्यंत अत्यंत थरारक ठरली. भारतीय खो-खो महासंघाच्या मान्यतेने व तेलंगणा खो-खो असोसिएशनच्या आयोजनाखाली झालेल्या या प्रतिष्ठित स्पर्धेत देशातील अव्वल संघांनी सहभाग नोंदवला होता. या राष्ट्रीय स्पर्धेचे बक्षीस वितरण तेलंगणाचे मुख्यमंत्री जगन्नाथ राघव रेड्डी तसेच महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सचिव डॉ. चंद्रजित जाधव यांच्या हस्ते करण्यात आले. पुरुषांच्या गटात रेल्वे संघाने आपले वर्चस्व सिद्ध करत महाराष्ट्रावर रोमहर्षक विजय मिळवून विजेतेपद पटकावले, तर महाराष्ट्र संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. या स्पर्धेत बीड जिल्ह्याचा ढाण्या वाघ करांडे तुकाराम याने आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सीनियर नॅशनल खो-खो स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत त्याने महाराष्ट्र संघाला द्वितीय क्रमांक मिळवून देण्यात मोलाचा वाटा उचलला. करांडे तुकारामच्या या यशामुळे बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रासह राष्ट्रीय पातळीवर उज्वल झाले आहे. त्याच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, प्रशिक्षक तसेच जिल्ह्यातील नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, आगामी स्पर्धांमध्ये त्याच्याकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. खो-खो मार्गदर्शक तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते प्रा.जे. पी. शेळके, एमॅच्युअर खो-खो असोसिएशन बीडचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेश शिंदे, सचिव विजय जाहेर, कोषाध्यक्ष योगेश सोळसे, सहसचिव मनोज जोगदंड यांनी करांडे तुकारामचे अभिनंदन केले आहे



## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २६/२०२६**

**कैलास पि. बाबुराव सोनवणे वि. साखराबाई भ्र. बजरंग सोनवणे**

**अर्जदार – कैलास पि. बाबुराव सोनवणे, वय ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. सुतार गल्ली गेवराई ता. गेवराई जि.बीड.**

विरूध्द

गैरअर्जदार – श्रीमती साखराबाई भ्र. बजरंग सोनवणे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुतार गल्ली गेवराई ता. गेवराई जि. बीड.

ज्याअर्थी **मयत बजरंग पि. लक्ष्मण सोनवणे, रा. सुतार गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड हे/हया दिनांक २०/०५/२०१४ रोजी रा. सुतार गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **मयत बजरंग पि. लक्ष्मण सोनवणे, रा. सुतार गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५/०१/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. **पुढील तारीख:- २०/०२/२०२६**

**( मार्फत ॲड. आर. ए. जोशी, गेवराई)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय क.स्तर गेवराई**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती एस. डी. सोनी ३ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १०१/२०२६**

**संतोष नागरगोजे व इतर वि. निरंक**

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

**अर्जदार: (१) संतोष पि. विष्णु नागरगोजे, वय- ३९ वर्षे, धंदा- शेती, रा. वडगांव गुंधा ता. जि. बीड. २) श्रीमंत पि. विष्णु नागरगोजे वय ३७ वर्षे, धंदा- शेती, रा. सदर. ३) विष्णु पि. आन्नाभाऊ नागरगोजे, वय ५८ वर्षे, धंदा-शेती, रा. सदर**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी **मयत नामे शिलाबाई विष्णु नागरगोजे या दिनांक १२ / १२ / २०२५ रोजी मयत** झालेल्या आहेत. अर्जदार क. १ व २ हे मयताचे मुले असून अर्जदार क. ३ हे मयताचे पती आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे शिलाबाई विष्णु नागरगोजे यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत शिलाबाई विष्णु नागरगोजे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**सदर प्रकरणात पुढील तारीख २७/०२/२०२६ आहे.**

आज दिनांक १६/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(ॲड. एस. एस. महाजन यांच्यामार्फत)**

**आदेशावरून (स्वाक्षरीत) अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर बीड**

**शिक्का** **(स्वाक्षरीत) क. लिपीक**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ ● पान ४



बीड अँड गोविंद नवनाथ अण्णा शिराळे पाटील आणि मंगेश धोंगडे यांची नगर सेवक पदी निवड झाल्या बद्दल वाघमारे परिवारातर्फे स्वागत करण्यात आले.



### कर्तव्य दक्ष अधिकारी....

रात्रीचे आठ वाजले होते तरीही बीडचे तहसीलदार श्री. चंद्रकांतजी शेळके साहेब यांचे काम चालूच होते. एका अपंग व्यक्तींनी त्यांना काम सांगितले व ताबडतोब जिल्हाधिकारी साहेबाना त्या व्यक्तीची अडचण सांगून बीड तहसीलमध्ये चक्रा मारण्याचा एका कॉल वर प्रश्न सोडवला व त्याला गावाकडे जाण्यासाठी आर्थिक मदत स्व खिशातून साहेबांनी केली.

# जरूड–वडवणी रस्त्यावर गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे भीषण अपघात

## सूचना फलक, बॅरिकेड्स व प्रकाशव्यवस्थेचा अभाव ; आंदोलनाचा इशारा – माजी सरपंच नागेश शिंदे

### दोघे युवक गंभीर जखमी

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील जरूड ते वडवणी या रस्त्याचे काम सध्या सुरू असून गुत्तेदाराच्या गंभीर निष्काळजीपणामुळे मौजवाडी फाटा येथे भीषण अपघात घडला. रस्त्याच्या मध्यभागी मातीचे ढिगारे टाकण्यात आल्याने धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. या रास्त्यावर संबंधित गुत्तेदाराने उपाययोजना न केल्याने अनेक अपघात झाले असून संबंधित गुत्तेदार एखादी जीवितहानी होण्याची वाट पाहत आहे का? असा असेल तर सवाल नागरिक करत आहेत. या रस्त्यावर योग्य सूचना फलक, बॅरिकेड्स व रात्रीची प्रकाश व्यवस्था नसल्यामुळे सायंकाळी साडेनऊच्या सुमारास झालेल्या अपघातात सुफियान शेख (वय १९) व शोहेब सय्यद (वय २०, रा. घाटसावळी, ता. व जि. बीड) हे दोघे युवक गंभीर जखमी झाले. जखमींना तातडीने खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सुफियान शेख यांच्यावर बीड येथील काकू नाना मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. सदर रस्त्याच्या कामात केवळ खड्डे खोदून ठेवण्यात आले असून कोणतीही सुरक्षिततेची उपाययोजना करण्यात आलेली नाही. याच मार्गावर यापूर्वीही अनेक अपघात घडल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून संबंधित गुत्तेदारावर तात्काळ कारवाई करावी व रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करून आवश्यक सूचना फलक लावावेत, अशी जोरदार मागणी माजी सरपंच नागेश शिंदे यांनी केली आहे. अन्यथा ढेकनमोहा येथे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

### ● अपघाताचे प्रमाण वाढले व धुळीमुळे नागरिक त्रस्त : नागेश शिंदे

या रस्त्याचे काम सुरू असून, या कामातील निष्काळजीपणामुळे रस्त्यावर धुळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे परिसरातील नागरिक, शालेय विद्यार्थी, वृद्ध व वाहनचालक मोठ्या त्रासाला सामोरे जात आहेत. रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत ठेवून केवळ खोदकाम करण्यात आले असून, धूळ नियंत्रणासाठी पाणी मारणे, रस्त्यावर मुरूम पसरवणे यासारख्या मूलभूत उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत. तसेच योग्य सूचना फलक, बॅरिकेड्स व रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था नसल्यामुळे अपघातांची मालिका सुरू आहे. या गंभीर रस्त्याचे काम त्वरित पूर्ण करून आवश्यक सूचना फलक, बॅरिकेड्स, रिफ्लेक्टर आणि धूळ नियंत्रणासाठी उपाय करावेत, अपघात व वाढती धूळ याकडे दुर्लक्ष केल्यास ढेकनमोहा येथे तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही माजी सरपंच नागेश शिंदे यांनी दिला आहे.



# तलवाडा येथील गाव तलाव लगटचे आतिक्रमण काढण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना जलसमाधी आंदोलन करणार : शेख खिजर, जयदेव शिगणे




**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील मौजे तलवाडा येथील जमिनीमध्ये असलेल्या पाझर तलावाच्या भिंती लगटच्या बेकायदेशीरपणे असलेले अतिक्रमण प्रशासकीय अधिकारी व ग्रामसेवक वेळो वेळी निवेदन व आंदोलनाचा इशारा देऊन देखील हटवत नसल्याकारणाने आम्ही दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी तलवाडा येथील पाझर तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी प्रशासनास दिं १५/१/२०२६ रोजी दिलेल्या निवेदनात म्हण्टले आहे. निवेदनात पुढे म्हण्टले आहे की वरिल संदर्भात आम्ही दिनांक ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● तलवाडा गाव तलाव लगटच्या आतिक्रमण संदर्भात जिल्हाधिकारी, बीडीओ, ग्रामसेवक व प्रशासकाची भुमीका संशयास्पद!

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गाव तलाव संरक्षण भीती लगटच्या आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात जिल्हाधिकारी बीड, बीडीओ गेवराई, ग्रामसेवक व प्रशासक तलवाडा यांना वेळोवेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्याची मागणी केली होती. त्या आणुषंगाने संबंधित प्रशासनाने आतिक्रमण धारकांना स्वताहुन आतिक्रमण काढुन घेण्या संदर्भात दोन दोन नोटीस देऊन अर्थिक तडजोडीतुन हे प्रकरण पेंडिंग ठेवल्याची चर्चा होत आसल्याने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे यांनी या बाबत संबधित प्रशासनास परत स्मरण पत्र व निवेदन देऊन हे आतिक्रमण ऊठवण्या संदर्भात मागणी करत २६/१/२०२६ रोजी प्रजासत्ताक दिनी तलवाडा गाव तलावात जलसमाधी आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे.

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनातून योग्य दिशा मिळते : सुभाष सानप

## मोफत प्रियदर्शी बहुजनवादी मिशन स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन



**बीड । प्रतिनिधी**

महापुरुषांच्या विचारांचा वारसा समर्थपणे पुढे घेवून जात असताना बुध्दीजीवी वर्गाने समाजातील उपेक्षि तांसाठी कार्य करणे आवश्यक आहे. ास्वतःच्या जबाबदारी व्यतिरिक्त सामाजिक दायित्वाचे तत्व आत्मसात करुन सशक्तपिढी घडविण्यासाठी ज्ञानदानाचे कार्य करणे, विशेषतः स्पर्धा परिक्षांची तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याने विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते, असे प्रतिपादन बीड शहर वाहतुक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक ▶उर्वरित पान २ वर

### ● विद्यार्थ्यांनी चिकाटीने अभ्यास करून अधिकारी व्हावे – पी व्ही बनसोडे

अशा समाजशील उपक्रमाची समाजाला गरज आहे, या स्पर्धेच्या युगामध्ये टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी चिकाटीने अभ्यास करणे गरजेचे आहे. आणि चिकाटीने अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र खूप मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरेल. या केंद्रातून निश्चित मोठमोठे अधिकारी घडतील त्यात शंका नाही. पी.व्ही बनसोडे यांनी अध्यक्षीय समारोपात असे प्रतिपादन केले.

# डॉ. आदित्य सोन्नर एमडी स्किन परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण

**माजलगाव । प्रतिनिधी**



येथील सिध्देश्वर महाविद्यालयातील प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांचा मुलगा डॉ. आदित्य प्रतिभा लक्ष्मीकांत सोन्नर याने एमडी स्किन या अत्यंत महत्वपूर्ण व कठीण असलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील परीक्षेत प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला आहे. आदित्यचे पहिली ते दहावीपर्यंत शिक्षण श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल माजलगाव येथे झाले. महाविद्यालयीन शिक्षण लातूर येथील राजश्री शाहू महाविद्यालय येथे पूर्ण केले तर एमबीबीएस चे शिक्षण केले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (घाटी) संभाजीनगर येथे पूर्ण केले तर मायमर हॉस्पिटल तळेगाव दाभाडे पुणे येथे डॉ. आदित्यने वैद्यकीय क्षेत्रातील एम.डी. सारख्या कठीण परीक्षेमध्ये यश मिळवून आकाशाला गवसणी घातली आहे. डॉ आदित्यचा लहान भाऊ डॉ. अजिंक्य हा देखील अमरावती येथे एमबीबीएसच्या अंतिम वर्षात शिकत आहे. यशाबद्दल डॉ. आदित्यचे भाशिप्र संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह हेमंत वैद्य, प्रा. चंद्रकांत मुळे, प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासनी, ॲड. विश्वास जोशी, अभय कोकड, प्रशांत भानप, पवन मानधने, प्राचार्य मुकुंद देवर्षी, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, ▶▶ उर्वरित पान २ वर

# माजी आ.भीमराव धोंडे यांनी रामकथेचे केले श्रवण कथा निरुपणकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या कौशल्याचे कौतुक



**आष्टी । प्रतिनिधी**

अध्यात्म हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मनुष्याच्या अंतिम समाधानासाठी धार्मिक कार्यक्रमात सहभाग आवश्यक असून त्यातून मिळणारे समाधान हे अंतिम असते असे उद्गार आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे माजी आ. भीमराव धोंडे यांनी काढले. दरम्यान, धार्मिक कार्यात निसंकोचपणे सर्वांनी उपस्थित राहून धर्म वाढवण्यासाठी सर्वोतोपरी सहभागी व्हावे असे आवाहनही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथे आ.सुरेश धस आणि संयोजन समितीच्या वतीने संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथेच्या आयोजन करण्यात आले आहे. माजी आ.भीमराव धोंडे यांनी आष्टी शहरात श्रीराम कथेच्या मंडपामध्ये आज आवर्जून उपस्थिती लावली. रामकथेत पाचव्या दिवशी माजी आ. भीमराव धोंडे यांनी भेट देऊन संगीत रामकथा निरूपणकार मंदार महाराज रामदासी यांच्या कथा निरुपणाच्या कौशल्याचे मन भरून कौतुक केले आणि या कथा आयोजकांचेही अभिनंदन केले. धार्मिक कार्यात्मिक संकोचपणे धर्म वाढवण्यासाठी आवर्जून उपस्थित असतो.सर्व नागरिकांनी आणि भाविक भक्तांनीही अशा धार्मिक उपक्रमात सहभागी झाले पाहिजे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.या संगीत ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● कथाकार ह.भ.प.मंदार महाराजांच्या पवित्रवाणीचा सुगंध दरवळला!

आपल्या पवित्रवाणीतून आणि केलेल्या अभ्यासातून रामायणातील अनेक प्रसंग साक्षात जिवंत करण्याचे हातोटी आणि कौशल्य ह.भ.प. मंदार महाराज रामदासी यांना लाभलेले आहे. त्यांच्या वाणीतून अनेक भाविक भक्तांमध्ये अध्यात्म समर्पणाचा भाव निर्माण होण्याची प्रेरणा निर्माण होईल असा विश्वास व्यक्त करत ह.भ.प.मंदार महाराज यांच्या कथा निरूपण कौशल्याचे मनापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी कौतुक केले आणि आयोजकांनाही धन्यवाद दिले.

# कापूस आयात शुल्कात सूट दिल्यास शेतकरी हक्क मोर्चा रस्त्यावर उतरेल : राजेंद्र आमटे

## सीआयटीआयची मागणी शेतकऱ्यांच्या मुळावर

**बीड । प्रतिनिधी**



कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्स्टाईल इंडस्ट्री (CITI) च्या मागणीनुसार केंद्र सरकारने यापूर्वी कापूस आयातीवरील ११ टक्के आयात शुल्क माफ केले होते. या निर्णयामुळे राज्यासह देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचा आरोप शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आला आहे. सरकारने व्यापारीधोरण अवलंबून मोजक्या टेक्स्टाईल उद्योगपतींच्या फायद्यासाठी कापूस आयात शुल्क माफ करून देशातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे काम केले, असा घणाघाती आरोप शेतकरी हक्क मोर्चाने केला आहे. ३१ डिसेंबरनंतर पुन्हा कापूस आयातीवर शुल्क लागू झाले असताना, आता पुन्हा सीआयटीआयने सरकारकडे आयात शुल्कात सवलत देण्याची मागणी केली आहे. सरकारने पुन्हा एकदा कापूस आयात शुल्कात सवलत दिल्यास शेतकरी हक्क मोर्चा तीव्र ▶▶ उर्वरित पान २ वर

# पत्रकार मारुती सत्रे यांची माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती व पोलिस मित्र संघटनेच्या आष्टी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती

**आष्टी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील रुई नालकोल येथील भूमिपुत्र, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मारुती सत्रे यांची माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती आणि पोलिस मित्र संघटना यांच्या आष्टी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच त्यांच्याकडे बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणूनही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. माहिती अधिकार पत्रकार संरक्षण समिती व पोलिस मित्र संघटना या महाराष्ट्रभर कार्यरत असलेल्या संघटना असून, समाजातील दुर्बल घटक, पत्रकारांचे हक्क, संरक्षण तसेच सामाजिक न्यायासाठी या संघटना सक्रियपणे कार्य करीत आहेत. यासोबतच पोलिस बांधवांना सामाजिक पातळीवर सहकार्य



मिळावे, जनतेत व पोलिसांमध्ये सुसंवाद निर्माण व्हावा यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. पत्रकार मारुती सत्रे हे यापूर्वीही आष्टी तालुक्यातील विविध सामाजिक प्रश्नांवर सातत्याने कार्यरत असून, सामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी व वंचित घटकांच्या समस्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते नेहमीच पुढाकार घेत असतात. सध्या ते दैनिक युवक आधार या वृत्तपत्रात जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत असून, आपल्या लेखन व पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम ते प्रामाणिकपणे करत आहेत.

या नियुक्तीप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष महेश सारणीकर, सचिव सचिन शेवाळे, कार्याध्यक्ष सखाराम कुलकर्णी तसेच राज्य संपर्कप्रमुख विकास गौरवाडकर यांच्या हस्ते मारुती सत्रे यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांच्या नावाची अधिकृत घोषणा करण्यात आली. या निवडीबद्दल आष्टी तालुक्यातील सर्व स्तरातून मारुती सत्रे यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पत्रकार बांधव, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांकडून त्यांच्या कार्याचे कौतुक होत आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे संघटनेच्या कार्याला आष्टी तालुक्यात निश्चितच अधिक बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.